# रणशिंग

लेखक
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**रणशिंग : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# रणशिंग

## अनुक्रमणिका


- हिंदुसंघटकांनी आपल्या राष्ट्राचा अितिहास
  कसा लिहावा नि वाचावा ? / ७
- शिवछत्रपतींचा जयजयकार ! / २०
- शिवरायांच्या यशस्वी राजनीतीचें अेक सूत्र / ३६
- 'थू: तुमच्या जिनगानीवर' / ४६
- डॉ. आंबेडकरांना अुत्तर. विजयशील हिंदुराष्ट्र ! / ५६
- अटकेवर हिंदु विजयाचा भगवा झेंडा / ७५
- मुसलमानांच्या खिलाफतीचा उदय, ऱ्हास आणि विनाश / ८७
- केमालपाशाने केलेलें तुर्कस्थानातून
  अरबी संस्कृतीचें उच्चाटन / १०२


✦✦

# हिंदुसंघटकांनी आपल्या राष्ट्राचा अितिहास कसा लिहावा नि वाचावा ?

अितिहास कसा लिहावा नि वाचावा ह्या सर्वसाधारण प्रश्नावरच अेक प्रबंध लिहावा असा विचार माझ्या मनात अनेक वर्षे घोळत आहे; पण नैमित्तिक राजकारण नि समाजकारण हेंच परिस्थिति-प्राबल्यामुळे जीवनाचें मुख्य कर्तव्य होअून बसलें आणि तें पार पाडता पाडताच जीवनाचा दिवस संपत आला. त्यायोगे जी अनेक साहित्याची नि विज्ञानाची आवडीची कामें राहून गेली त्यातंच हा प्रबंधही आजवर अिच्छेचे फाटकापाशी अडकून पडला आहे. परंतु सध्या आपल्या हिंदुराष्ट्राच्या अस्तित्वासाठी सुद्धा जी झुंज अनिवार्य झाली आहे ती लढवण्यासाठी अितर साधनांप्रमाणेच प्रत्येक हिंदुसंघटकाला आपल्या हिंदुस्थानचा अितिहास कसा लिहावा नि वाचावा, हिंदुसंघटनाला वर्तमानकालांत अधिक बलशाली करण्यासाठी भूतकालाचा कुठवर नि कसा अुपयोग करून घ्यावा हें कळणें अगदी अवश्य आहे. नाही तर संघटनेच्या ठायी विघटना होण्याचें भय आहे. आपल्या हिंदुत्ववादाच्या बौद्धिक मांडणीमध्ये हिंदुस्थानाचा अितिहास हिंदुसंघटकांनी कसा लिहावा नि वाचावा हाही अेक अध्याय अवश्य हवा. त्याविषयी या लेखात काही प्राथमिक विधेयें (Points) तेवढी अगदी संक्षेपत: देत आहे.

प्रत्येक हिंदुसंघटकाने हिंदुस्थानच्या वैदिककालापासून तों आजपर्यंतच्या अितिहासाचा हिंदुत्वाच्या विशिष्ट दृष्टिकोनातून अभ्यास केला पाहिजे. आपल्यापैकी जे पुढारी, पत्रकार, अध्यापक, शिक्षक, बौद्धिक वर्गचालक, वक्ते असे असतील त्यांनी तर आपल्या अितिहासाचे विशेषज्ञ झालेंच पाहिजे. देवदैत्य,

देवदानव, सुरासुर, आर्यानार्य या द्वंद्वांचा अर्थ काय तो समजून घेतला पाहिजे. त्यांची युद्धे नि संधि होता होता अुत्तरापथाचा नि दक्षिणापथाचा संबंध कसा आला, तेथेही संघर्ष नि समन्वय चालू असता यक्ष, राक्षस, किन्नर, नाग, अहिप, भूत, तक्षक प्रभृति अुत्तरेतील नि दक्षिणेतील पौराणिक कालात अुल्लेखिलेल्या जाती अेका महान भारतीय राष्ट्रात कशा समाविष्ट झाल्या, मोठमोठ्या सम्राटांच्या कधी अुत्तरेकडून दक्षिणेकडे नि कधी दक्षिणेकडून अुत्तरेकडे नि बळावलेल्या साम्राज्यामुळे ह्या राष्ट्राच्या संस्कृतीत अनेक अुपजातीय संस्कृति, चालीरीति, भाषा, विभाषा मिसळत जाअून त्या सर्वांची मिळून अेक महान भारतीय संस्कृति कशी अुत्पन्न झाली, मनुस्मृतीत विस्तरश: वर्णिल्याप्रमाणे अनुलोम-प्रतिलोमाच्या पद्धतीचे सहस्रावधि विवाह होअून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र ह्यांचे रक्तबीजही अेकमेकांत कसें मिसळलें, अितकेंच नव्हे, तर नव्या वन्य वा अन्य जाती जशाजशा ह्या भारतीय राष्ट्रात नि संस्कृतीत सामावू लागल्या तसेतसे त्यांचे आपसात रक्तसंबंध कसे जुळत गेले, क्षत्रिय भीमाचे हिडिंबा राक्षसीशी कोणीही न बहिष्कारलेलें लग्न किंवा अर्जुनाचे मणिपूरच्या नागराजाच्या कन्येशी झालेले लग्न आणि अशा सुप्रसिद्ध अुदाहरणांवरून नि अनुलोम आणि विशेषत: प्रतिलोमप्रथेवरून सिद्ध होणारी अशी सहस्रावधि लग्नें ह्यांच्या योगाने हे भिन्न भिन्न लोक रक्तबीजानेही कसे अेका महत्तम राष्ट्रात अेकरूप पावले, सगळ्यांची मिळून अेक संस्कृति, अेक राष्ट्रीय भाषा, अेकराष्ट्रीयत्वाची जाणीव कशी विकसत गेली, पुढे आपल्या ह्या प्राचीन अितिहासाच्या अर्वाचीन काळी ग्रीक, शक, हूण अित्यादि परचक्रें आलीं असता त्यांची राज्यें तीन तीन शतकें अिथे चालत असता आपल्यात मोठे पराक्रमी, विक्रम वारंवार जन्मास येअून त्या परकीय राजशक्तींना रणांगणात धूळ चारून पुन:पुन्हा आपली साम्राज्यें कशी स्थापिली गेली आणि त्या लक्षावधि परकीयांना आपली संस्कृती, धर्म, भाषा, यांच्या प्रभुत्वाखाली आणून त्यांस आपल्या या भारतीय राष्ट्रात कसें जिरवून पचवून टाकलें; पुढें मुसलमान आले, त्यांच्याशी सातआठ शतकें सारखें युद्ध खेळत त्यांच्याही साम्राज्यसत्तेची आम्ही हिंदूंनी रणांगणांत कशी धुळधाण अुडविली आणि 'हिंदुपदपादशाही' पुन: कशी स्थापन केली हा वैदिकपूर्वकालापासून ब्रिटिशांची



सत्ता स्थापन होअीपर्यंतचा इतिहास हिंदुसंघटकांनी अैतिहासिक विशेषज्ञांनी सांगोपांग आणि अर्थसमन्वयी दृष्टीने अभ्यासावा. त्यावर ग्रंथ लिहावे. प्रसिद्धीची साधनें मिळताच प्रसिद्धिले जातील, पण तोंवर निदान लिहून तरी ठेवावे.

त्यातील निवडक कालखंडाची लहान, सुबक नि सारांशमय पुस्तके मात्र शक्य तितक्या लवकर प्रसिद्धिलीं जावींत. कै. वैद्यांचे रामचरित्र किंवा कृष्णचरित्र किंवा श्री. सरदेसाअी यांची शिवाजी, संभाजी, बाजीराव यांची चरित्रे, त्रोटक चरित्रें, वसअीचा वेढा, श्रीहर्षाचें चरित्र, चंद्रगुप्त, विक्रम यांची चरित्रें, चाणक्यांच्या त्या अत्यंत मूल्यवान असणाऱ्या अर्थशास्त्रातील काही राज्यघटनात्मक नि राज्यसंचलनात्मक भाग, त्या वेळच्या समाजाचें मूर्तिमंत चित्र आखणारी सुरेख वर्णनें अशी अेकेक प्रकरणाचीं मागे 'धनुर्धारी' लिहीत तशीं पण अद्ययावत् असलेलीं अैतिहासिक लहान पुस्तकें प्रसिद्धिली जावीत. ही लहान पुस्तकें प्रत्येक हिंदुसंघटनी प्रचारकाने अभ्यासिली पाहिजेत.

आपल्या ह्या वेदपूर्वकालीन नि वेदकालीन आरंभापासून तों आजवर ह्या वर अुल्लेखिलेल्या आर्य, अनार्य, यक्ष, राक्षस, भूत, पिशाच, शक, यवन, हूण, प्रभृति प्राचीन नि अनेक अर्वाचीन परकीय वा स्वकीय जातींची अत्यंत कौशल्याने घडवून आणलेली ह्या आपल्या आजच्या 'हिंदुराष्ट्रात' जी सलग समन्वित नि अेकजीव परिणति झाली आहे ती जगाच्या अितिहासातील मानवी संघटनाचें अेक अत्यंत आश्चर्यकारक अुदाहरण आहे. भरतखंडांतील नाना लहानमोठ्या नदनद्या, भिन्न दिशांनी वाहत वाहत शेवटी जशा सिंधुसागरापासून तों गंगासागरापर्यंत विस्तारलेल्या हिंदुमहासागरात अेकजीव झाल्या आहेत त्याचप्रमाणे वैदिक युगापासून तो आजपर्यंतच्या नाना जाति, अुपजाति, धर्मपंथ, प्रांत अेकत्र होत होत, अेकमेकात मिसळत मिसळत, आमच्या वैदिक पूर्वजांनी जें ध्येय आखलें होतें तें शेवटी गाठून आजच्या आमच्या ह्या 'हिंदु' राष्ट्रात अेकजीव झाले आहेत. आसिंधुसिंधु भारतभूमिका हीच ज्याची पितृभू आणि पुण्यभूहि आहे तो तो हिंदु. पूर्वी आम्ही कोणी आर्य असू वा अनार्य, गोंड असू वा भिल्ल, ब्राह्मण असू वा शूद्र, वैदिक असू वा अवैदिक, जैन असू वा बौद्ध, सारस्वत असू वा द्रविड, शैव असू वा वैष्णव, आज आम्ही सर्व राष्ट्रीय अर्थाने 'हिंदु' आहोंत. हे आमचे

अेकजीवन आज ज्या अेकाच शब्दात वरील व्याख्येप्रमाणे व्यक्तविता येतें तो अनन्य शब्द आहे 'हिंदु' !

या शब्दाच्या 'हिंदु' या दोन अक्षरांत अगस्तीच्या अंजलीत जसा महासागर तसें तीस कोटी लोकांचे राष्ट्रचें राष्ट्र सामावलेलें आहे.

अितक्या दीर्घ कालावधीत परस्परांशी संबंध आलेल्या अनेक घटकांतील राष्ट्रभेद, जातिभेद, धर्मभेद, भाषाभेद, संस्कारभेद, ह्यांना अेका हिंदुराष्ट्रात अेकजीव करण्याचें महत्कार्य आजच्या परिणतीपर्यंत तरी जे आपल्या पूर्वजांनी आणून ठेवले आहे तें शस्त्र नि शास्त्र या दोन्ही साधनांच्या साहाय्यानेच होय. केवळ विग्रहानेच, जित नि जेते म्हणून ते अेकरूप पावते ना. केवळ संधीनेच ते सांधले जाते ना. केवळ मन वळवून ते वळते ना किंवा केवळ परस्परांचा अुच्छेद करून सगळ्यांना विनाशून अेकच कोणी तरी अवशिष्ट अुरता ना. संधि, विग्रह, शस्त्र, शास्त्र, समर नि समन्वय अशा दुहेरी नीतीनेच लहान टोळ्यांच्या जातींची अुपराष्ट्रें आणि अुपराष्ट्रांची महान राष्ट्रें बनतात. सगळ्यांच्या माहितीचें म्हणून लहानसें ब्रिटनचेच अुदाहरण घ्या. मूळचे ड्र्यूइड्स, ब्रिटन्स, एंजल्स, सॅक्सन्स, नॉर्मन्स, अेक ना दोन अनेक परस्थ वा त्रयस्थ जातींच्या स्वाऱ्या, कलह, संधि होता होता शेवटी तीन मोठे भाग अुरले. ते स्कॉटलंड, अिंग्लंड नि वेल्स. हेही परस्परांशी आज विग्रह तर अुद्या संधि, काही धर्माच्या प्रेमबंधाने तर काही राजनीतीच्या वशिल्याने, काही शरणागति, काही देवाण-घेवाण अशा दीर्घकालीन प्रक्रियेतूनच शेवटी अेक सबळ राष्ट्र बनलें. त्यांतही धार्मिक, राजवंशीय, पक्षविपक्षीय, अशी कारणपरत्वें पुन्हा पुन्हा यादवी माजली. शेवटी आज बाह्य परिस्थितीचें दडपण अंतर्गत अेकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विकास, सर्वांचे राजकीय प्रभृति हितसंबंध नि प्रभाव आपल्या राष्ट्रैक्यामुळेच काय तो टिकू शकत आहे ही अनुभवाने पटलेली निश्चिति ह्या नि अशा कारणांनी ब्रिटनचें राष्ट्र अेकजीव आणि अेकप्राण झालें आहे. यात आयर्लंड गोवण्याच्या यत्न झाला, पण तो अजून तरी सफल झाला नसल्यामुळे ब्रिटनचें ग्रेट-ब्रिटन बनू शकलें नाही, पण समन्वयाची ती प्रक्रिया अजूनही चालू आहे. ब्रिटनसारख्या केवळ चारपाच कोटींच्या राष्ट्राची जर मूळ कथा अशी आहे तर तीस कोटि लोकांच्या भरतखंडासारख्या विस्तीर्ण



भूभागावर निवसणाऱ्या आमच्या आज एकजीवित्व पावलेल्या ह्या महान 'हिंदुराष्ट्राची' कुलकथा त्या राष्ट्रनिर्मांत्या प्रक्रियेपासून अलिप्त कशी असणार?

हिंदुराष्ट्राचा अितिहास लिहिताना हीच अडचण प्रत्येक हिंदुसंघटनाच्या अभिमानी असणाऱ्या लेखकासमोर दत्त म्हणून अुभी राहिल्यावाचून राहणार नाही; पण तरीही प्रत्येक अितिहासलेखकाचें आद्यकर्तव्य बजावण्यास त्याने मुळीच टाळाटाळ करू नये. अितिहास लिहावयाचा तर तो अगदी 'अिति-ह-आस' असाच लिहावा. त्याचे वर्तमानकालावर काय परिणाम होतील, ह्याची तो अितिहास लिहितेवेळी, त्याने मुळीच चिंता बाळगू नये. अैतिहासिक संशोधनाने अद्ययावत् म्हणून ठरलेली त्या त्या कालखंडांची माहिती अगदी सत्य तशीच लिहावी. राष्ट्रैक्याची किमया साधीत असताना किंवा चालत असताना वर सांगितलेली जी अपरिहार्य प्रक्रिया आहे तीमधून अितर कोणत्याही राष्ट्राप्रमाणेच हिंदुराष्ट्रालाही जावें लागणें अपरिहार्य होते. त्यामुळे आपल्याही राष्ट्रावर अनेक परचक्रें आलीं, त्यांच्याशी शतकव्यापी युद्धे झाली. केव्हा अंतर्गत यादवीही चालू राही. धार्मिक मतभेदांनीही केव्हा केव्हा अुग्र स्वरूप धारण केलें; परंतु अवांच्छनीय घटनाही अितिहास-लेखकांनी तितक्याच सत्यतेने सांगावयास हव्यात की, जितक्या सत्यतेने आपल्या हिंदु-राष्ट्रांतील मोठमोठ्या सम्राटांच्या वैभवशाली राजवटींना किंवा आपल्या सहस्रश: गौरवान्वित घटनांना स्वराष्ट्राभिमानी अितिहासकार अितिहास व्यवस्थितपणे वर्णितात. अुदहारणार्थ, अितिहासकार जरी स्वत:ला आर्यवंशीय समजत असला तरीही त्याने पूर्वी अनार्यांशी झालेली युद्धें किंवा मोठमोठे अनार्य राजे, तत्त्वज्ञानी, वीर होअून गेले त्यांचे वर्णन यथावत् केलें पाहिजे. कारण आपण आज आर्यांचा वा अनार्यांचा पक्षपाती अितिहास लिहीत नसून 'हिंदु राष्ट्राचा' अितिहास लिहीत आहोत आणि या हिंदुत्वात पूर्वींचे आर्यानार्यादि सारे वंश आणि त्यांच्या कुलकथा संमीलित आणि अेकजीव झालेल्या आहेत. कोणी अितिहासलेखक वैदिक धर्माचा अभिमानी असेल, पण म्हणून त्याने पूर्वींच्या अितिहासातील आपल्या अवैदिक बुद्ध वा जैनधर्मीयांशी वैदिक धर्मीयांच्या काही वेळा झालेल्या विग्रहाचें वर्णन केवळ वैदिकांचीच बाजू अुचलून धरण्यासाठी पक्षपाताने करू नये किंवा तसे विग्रह आपआपसांत काही